34

E.38

## विद्यमान सिव्हील जज्ज वरीष्ठ दिवाणी न्यायालय, गंगाखेड

वाद्पत्र: ३६९/२०२४

वादी : बालासाहेब **विरुद्ध** प्रतिवादी :हरिश्चंद्र वगैरे

**वाद** : Preferential rights

वादी तर्फे ओर्डेर ६ रूल १७ तसेच कलम १५१ CPC तहत खालील प्रमाणे अर्ज सादर करण्यात येत आहे.

ORDER
other side to say

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.06.10 16:56:09 +0530

CJSD, Gangakhed

1. असे की, वादीने प्रस्तुत वाद्पत्र प्रतिवादी कडून वादग्रस्त शेती तुकाडेबंदी कायद्या तहत विकत घेण्याचा तो अधिकारी आहे हे जाहीर करण्याचे दाखल केले आहे.
2. असे की, प्रतिवादी ने आपल्या लेखी निवेदन मध्ये वाद्पत्रात दाखल केलेल्या sketch map प्रमाणे गट नं.२८६ व २८७ मधील वादी ची व त्यांची जमीन हे मान्य केले आहे.
3. असे की, वादी ने प्रस्तुत वाद्पत्रात ओर्डेर ३९ रूल १ व २ चा अर्ज दाखल केला होता तो विद्यमान कोर्टाने खारीज केला आहे वाद्पत्र सादर करताना नजर चुकीने काही गोष्टी बाबत लिहिण्याचे राहून गेले होते. वादी व प्रतिवादी हे sketch map मध्ये दाखविल्या प्रमाणे एकमेकांचे शेजारी आहेत व वाद्पत्र दाखल करताना त्यांनी वादी च्या मालकीच्या शेतीला अडी हरकती करीत होते. त्या बाबत वाद्पत्रात मागणी करावयाची



Copy received

राहून गेली त्यामुळे वाद व विनंती मध्ये मागणी नं. ५ हे खालील प्रमाणे वाढविणे आहे.

५. "प्रतिवादीच्या विरुद्ध शास्वत निषेध आज्ञा अशी देण्यात यावी की, त्यांनी वादी च्या वादग्रस्त गट नं.२८७ मधील ३५ गुंठे जमीन व गट नं.२८६ मधील ५६ आर जमीन sketch map मध्ये दाखविल्या प्रमाणे यात अडी हरकती करू नये"

4. असे की, वादी ची शेती हि प्रतिवादीच्या शेतीला लागत असल्यामुळे त्यास (Easementary Right) सुविधाधिकार किंवा वहिवाट हक़्क़ प्राप्त झाल्यामुळे वादग्रस्त शेती विकत घेण्याचा तो अधिकारी आहे. या बाबतची प्लेडींग वाद्पत्रात नजर चुकीने करण्याची राहून गेली आहे कारण या पूर्वी वादी ने वादग्रस्त शेतीतील हिस्सेदार शिवदास यांची शेती विकत घेतलेली आहे. त्यामुळे वाद्पत्रात कलम ९ नंतर कलम ९/१ खालील प्रमाणे वाढविणे आहे.

९/१. "असे की, वादी ची शेती हि प्रतिवादीच्या शेतीला लागत असल्यामुळे त्यास (Easementary Right) सुविधाधिकार किंवा वहिवाट हक़्क़ प्राप्त झाल्यामुळे वादग्रस्त शेती विकत घेण्याचा तो अधिकारी आहे. या पूर्वी वादी ने वादग्रस्त शेतीतील हिस्सेदार शिवदास यांची शेती विकत घेतलेली आहे."

5. असे की, वादी च्या या दुरुस्तीमुळे वाद्पत्राचे स्वरूप बदलत नाही प्रतिवादीच्या हक़्क़ावर परिणाम होत नाही अद्याप वाद्पत्रात साक्ष पुरावा सुरु झालेला नाही सोबत वादी ची शपथपत्र देण्यात येत आहे.

## <u>विनंती की,</u>

अर्ज मान्य करून वादी स प्रस्तुत वाद्पत्रात वरील प्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

दिनांक :१०/०६/२०२६ वादी

[signature]

बालासाहेब वामनराव तिडके
रा डोंगर पिंपळा
ता. गंगाखेड जिल्हा परभणी

<u>तसदिक</u>

मी बालासाहेब वामनराव तिडके शपथेवर निवेदन करतो की माझ्या अर्जातील मजकूर हा मी सांगितल्या प्रमाणे खरा व बरोबर आहे. करिता आज रोजी तसदिक करण्यात आली.

दिनांक :१०/०६/२०२६ वादी

[signature]

बालासाहेब वामनराव तिडके
रा डोंगर पिंपळा
ता. गंगाखेड जिल्हा परभणी

तर्फे [signature]

Adv. उदय कि. चौधरी

गंगाखेड

<u>से.</u> प्रस्तुत वादपत्रात वादीच्या मालकी ताब्याच्या जमिनीच्या वाटप बाबी ज्या जमिनीला वाद नाही त्याबाबत कायद्याने कोणतीही मागणी वादीस करता येणार नाही. तसेच सदर दुरुस्तीबाबत cause of action नाही. वादपत्रात व स्वरूपात पूर्णपणे बदल होणार आहे. त्यामुळे वादीने दाखल केलेला बेकायदेशीर अर्ज खारीज करण्यात यावा.

[signature] Adv. B. S. Mundhe
for deft no. 1.
10/06/26.

Say

वादिने वादपत्र सादर करताना
आडी हरकती करू नये अशी
मागणी करावयास हवी होती
अर्जात वादीच्या ताब्यात आडी
हरकती झाली असे कथन नाही
त्यामुळे या मागणी बद्दल cause
of action चा प्रश्न निर्माण होतो
वादीची वादपत्रात मागणी
Preferencial मंजुर बाबत
होती Ex.5 नामंजुर झाल्यामुळे
suit infructus झाला आहे
वादपत्र जिवंत राहावे म्हणुन मनाई
आज्ञाची दुरुस्ती करण्यात येत आहे
अर्जात subsequent event नाही
due deligence नाही त्यामुळे
अर्ज रेनेबल होत नाही खारीज करावा

श्रीकांतनकेले
10.6.26

## विद्यमान सिव्हील जज्ज वरीष्ठ दिवाणी न्यायालय, गंगाखेड

वाद्पत्र: ३६९/२०२४

वादी : बालासाहेब **विरुद्ध** प्रतिवादी :हरिश्चंद्र वगैरे

**वाद** : Preferential rights

## शपथपत्र

मी, बालासाहेब पिता वामनराव तिडके वय ५५ वर्षे धंदा शेती रा. डोंगर पिंपळा ता.गंगाखेड जि.परभणी शपथेवर निवेदन करतो की, माझ्या प्रस्तुत वाद्पत्र प्रतिवादी कडून वादग्रस्त शेती तुकाडे बंदी कायद्या तहत विकत घेण्याचा तो अधिकारी आहे हे जाहीर करण्याचे दाखल केले आहे. प्रतिवादी ने आपल्या लेखी निवेदन मध्ये वादपत्रात दाखल केलेल्या sketch map प्रमाणे गट नं.२८६ व २८७ मधील वादी ची व त्यांची जमीन हे मान्य केले आहे. वादी ने प्रस्तुत वाद्पत्रात ओर्डेर ३९ रूल १ व २ चा अर्ज दाखल केला होता तो विद्यमान कोर्टाने खारीज केला आहे वाद्पत्र सादर करताना नजर चुकीने काही गोष्टी बाबत लिहिण्याचे राहून गेले होते. वादी व प्रतिवादी हे sketch map मध्ये दाखविल्या प्रमाणे एकमेकांचे शेजारी आहेत व वाद्पत्र दाखल करताना त्यांनी वादी च्या मालकीच्या शेतीला अडी हरकती करीत होते. त्या बाबत वाद्पत्रात मागणी करावयाची राहून गेली त्यामुळे वाद व विनंती मध्ये मागणी नं. ५ हि खालील प्रमाणे वाढविणे आहे."प्रतिवादीच्या विरुद्ध शास्वत निषेध आज्ञा अशी देण्यात यावी की, त्यांनी वादी च्या वादग्रस्त गट नं.२८७ मधील ३५ गुंठे जमीन व गट नं.२८६ मधील ५६ आर जमीन sketch map मध्ये दाखविल्या प्रमाणे यात अडी हरकती करू नये"

वादी ची शेती हि प्रतिवादीच्या शेतीला लागत असल्यामुळे त्यास (Easementary Right) सुविधाधिकार किंवा वहिवाट हक्क प्राप्त झाल्यामुळे वादग्रस्त शेती विकत घेण्याचा तो अधिकारी आहे. या बाबतची प्लेडींग वाद्पत्रात नजर चुकीने करण्याची राहून गेली आहे कारण या पूर्वी वादी ने वादग्रस्त शेतीतील हिस्सेदार शिवदास यांची शेती विकत घेतलेली आहे. त्यामुळे वाद्पत्रात कलम ९ नंतर कलम ९/१ खालील प्रमाणे वाढविणे आहे."असे की, वादी ची शेती हि प्रतिवादीच्या शेतीला लागत असल्यामुळे त्यास (Easementary Right) सुविधाधिकार किंवा वहिवाट हक्क प्राप्त झाल्यामुळे वादग्रस्त शेती विकत घेण्याचा तो अधिकारी आहे. या पूर्वी वादी ने वादग्रस्त शेतीतील हिस्सेदार शिवदास यांची शेती विकत घेतलेली आहे." वादी च्या या दुरुस्तीमुळे वाद्पत्राचे स्वरूप बदलत नाही प्रतिवादीच्या हक्कावर परिणाम होत नाही अद्याप वाद्पत्रात साक्ष पुरावा सुरु झालेला नाही करिता शपथपत्र देण्यात येत आहे ते खरे व मान्य आहे.

दिनांक :१०/०६/२०२६ प्रतिज्ञक

बालासाहेब वामनराव तिडके

<u>तसदिक</u>

मी बालासाहेब वामनराव तिडके शपथेवर निवेदन करतो की माझ्या शपथपत्रातील मजकूर हा मी सांगितल्या प्रमाणे खरा व बरोबर आहे. करिता आज रोजी तसदिक करण्यात आली.

दिनांक :१०/०६/२०२६ प्रतिज्ञक

बालासाहेब वामनराव तिडके

AFFIDAVIT

Solemnly affirmed before me
by Balasaheb Wamanrao Tidke
Age: 55 years occ. Agri R/o Dongarpimpla Ta: Gangakhed
Dist: Parbhani
Who is Identified before me
by Adv. G. K. Choudhari, Gangakhed

2

to whom I know personally

Supdt. 10/6/2026
CJSD Court Gangakhed